# **A Midsummer Night's Dream**: विल्यम शेक्सपियर

संक्षिप्त मराठी कथारूप अनुवादः प्रा. डॉ. बिंदुमाधव जोशी

<u>प्रास्ताविकः</u>

शेक्सपियरच्या काळी लोकांचा अतिमानवी शक्तींवर [Supernatural Powers] विश्वास होता. शेक्सपियरने आपल्या नाटकात या शक्तींचा - भुते, चेटकिणी, पऱ्या यांचा - कथानकात रंजकता आणण्यासाठी महत्त्वाचा घटक म्हणून वापर केलेला आहे. ’हॅम्लेट’मधील भूत, मॅकबेथमधील चेटकिणी या कथानकाच्या परिपोषामधे [development] महत्त्वाची भूमिका बजावतात हे आपण पाहिले आहे. परीराज्यातील राजाराणी व नटखट दूत आपल्या नवीन नाटकात - A Midsummer Night's Dream - सुखांतिका घडवून आणण्यात बराच मोठा सहभाग देत आहेत. जगातील सर्वात प्राचीन ग्रीक संस्कृती जेथे जन्माला आली त्या ग्रीसच्या राजधानी अथेन्समधील परीराज्यात आपण जात आहोत, जेथे स्वप्नवत घटना घडतात.

<u>प्रमुख पात्रेः</u>

| | |
|---|---|
| थीस्यसः | अथेन्सचा ड्यूक |
| एग्यसः | अथेन्सचा नागरिक |
| हर्मियाः | एग्यसची कन्या; लिसॅण्डरची प्रेमिका |
| हेलेनाः | हर्मियाची मैत्रीण; डिमेट्रियसची प्रेमिका |
| लिसॅण्डरः | अथेन्सचा तरूण नागरिक |
| डिमेट्रियसः | अथेन्सचा तरूण नागरिक |
| ओबेरॉनः | परीराज्याचा राजा |
| टिटॅनियाः | पऱ्यांची राणी |
| पकः | ओबेरॉनचा सेवक |

<u>कथानकः</u>

फार पूर्वी अथेन्समध्ये एक विचित्र नियम होता की मुलीने आपल्या वडिलांच्या मर्जीविरूद्ध लग्न केल्यास तिला जोगीण होण्याची किंवा मृत्यूची शिक्षा दिली जात असे. अर्थात या अघोरी नियमाचा वापर करण्याची वेळ फार क्वचित येत असे. पण एकदा तसा प्रसंग आला. एग्यस हा नागरिक आपली मुलगी हर्मिया ही त्याच्या पसंतीच्या डिमेट्रियस नावाच्या युवकाशी लग्न करत नाही म्हणून तिला शिक्षा द्यावी अशी तक्रार घेऊन ड्यूककडे आला. ड्यूकने हर्मियाचे मन वळवण्याचा प्रयत्न केला पण तिचे लिसॅण्डर नावाच्या तरूणावर प्रेम असल्याने तिने आपलाच हेका चालू ठेवला. खरे तर डिमेट्रियस व हर्मियाची मैत्रीण हेलेना यांचे एकमेकावर प्रेम असते. पण का कोण जाणे, कदाचित हर्मिया अधिक सुंदर असल्यामुळे डिमेट्रियस आपले प्रेम विसरून हर्मियाशी लग्न करण्याचा आग्रह धरतो. ड्यूकला हर्मियाबद्दल सहानुभूती असते, पण कायद्यापुढे व एग्यसच्या अट्टाहासापुढे त्याचे काही चालत नाही. हर्मियाला तो दुसऱ्या दिवसाच्या सूर्योदयापर्यंत मुदत देतो. सूर्योदय होताच तिने आपला निर्णय जाहीर करायचा - डिमेट्रियसशी लग्न, वा मृत्यू किंवा आजन्म

संन्यास. बैठक संपते. दुसऱ्या दिवशी ड्यूकचेही त्याच्या नियोजित वधूशी - हिपोलिटाशी - लग्न होणार असते, त्यामुळे त्याने एवढी मुदत दिलेली असते.

या पेचप्रसंगातून सुटण्यासाठी लिसॅण्डर हर्मियाला एक उपाय सुचवतो. अथेन्सपासून काही अंतरावर असलेल्या गावी लिसॅण्डरची सुखवस्तू आत्या रहात असते. अथेन्सचा कायदा तिथे लागू होत नाही. आत्याचे त्याच्यावर मुलासारखे प्रेम असते. तेव्हा त्या रात्री अंधाराचा फायदा घेऊन अथेन्स सोडून पळून त्या गावी जावे. हर्मियाला ही कल्पना लगेच मान्य होते व शहराबाहेरील एका जंगलात रात्री ते भेटायचे ठरवतात. हर्मिया आपला हा बेत हेलेनाला सांगते व हेलेना तो डिमेट्रियसला सांगते.

शहराबाहेर असलेल्या या जंगलात पऱ्यांचे राज्य असते; व फार थोड्या लोकांना त्याची माहिती असते. त्या परीराज्यात ओबेरॉन आपली राणी टिटानिया हिच्यासह रहात असतो. असंख्य स्त्रीपुरूष पऱ्या या राज्यात त्यांची विविध कामे करत असतात. त्या दिवशी एका किरकोळ कारणामुळे राजा व राणी मध्ये बेबनाव झालेला असतो व ती त्याच्यावर रूसलेली असते. नाराज झालेला ओबेरॉन तिचा रूसवा काढण्यासाठी तिची गंमत करायचे ठरवतो. त्याच वेळी डिमेट्रियस व हेलेना हर्मियावरून एकमेकांशी वाद घालत जाताना त्याला दिसतात. त्या प्रेमी जोडप्याचा मिलाफ घडवून आणावा असेही त्याला वाटते. म्हणून त्याच्या बागेतील एका वनस्पतीचा उपयोग दोन्ही कामासाठी करायचे तो ठरवतो. त्या वनस्पतीच्या फुलाचे कुस्करून २ थेंब झोपलेल्या व्यक्तीच्या डोळ्यात टाकले तर त्याचा मोठा गंमतीशीर परिणाम त्या व्यक्तीवर होतो: ती व्यक्ती उठल्यावर ज्या व्यक्तीला प्रथम पाहील त्या व्यक्तीवर प्रेम करायला लागते, पूर्वीचे प्रेम विसरून! ओबेरॉन आपल्या ’पक’ नावाच्या विश्वासू सेवकाला त्या फुलाचे कुस्करून २/३ थेंब संधी मिळताच झोपलेल्या डिमेट्रियसच्या डोळ्यात टाकायला सांगतो. त्याला ओळखण्यासाठी जोडप्यातील अथेनियन कपडे घातलेला पुरूष अशी त्याची ओळख सांगतो. आणि स्वतः संधी मिळताच त्या फुलाचे दोन थेंब आपल्या राणीच्या डोळ्यात ती झोपली असताना टाकतो.

पक अथेनियन जोडप्याला शोधत असताना त्याला जंगलात आधीच आलेले व थकून झोपलेले लिसॅण्डर-हर्मिया दिसतात. राजाने सांगितलेले हेच जोडपे समजून पक लिसॅण्डरच्या डोळ्यात त्या फुलाचा रस टाकतो. थोड्या वेळाने लिसॅण्डरला जाग येते त्यावेळी डिमेट्रियस सोडून गेल्यामुळे एकटीच भटकत असलेली हेलेना त्याला दिसते व तो तिच्याशी प्रेमाने लाडीगोडी करू लागतो. तिला त्याच्या वागण्याचे आश्चर्य वाटते व ती त्याला झिडकारून जाऊ लागते, तर तोही हर्मियाकडे दुर्लक्ष करून तिच्या पाठोपाठ जातो. थोड्या वेळाने हर्मिया जागी होते; लिसॅण्डर शेजारी नाही हे पाहून ती अस्वस्थ होते व त्याला शोधत रानोमाळ भटकत राहते. तिला डिमेट्रियस भेटतो व त्यानेच लिसॅण्डरला दूर नेले, कदाचित त्याला मारून टाकले असे दोषारोपण त्याच्यावर करू लागते. तो तिची समजूत पटवायचा खूप प्रयत्न करतो.

दरम्यान परीराजा ओबेरॉन आपल्या राणीच्या डोळ्यात फुलाच्या रसाचे थेंब टाकल्यानंतर पकला त्याच्यावर सोपवलेल्या कामगिरीबद्दल विचारतो. पक आपले काम चोख बजावल्याचा रिपोर्ट देतो.

तेवढ्यात त्यांच्या समोरून डिमेट्रियस व हर्मिया भांडत भांडत येताना दिसतात. त्यावरून ओबेरॉनच्या लक्षात येते की पकने चुकीच्या माणसाच्या डोळ्यात थेंब टाकले, त्यामुळे उलट प्रेम करणारे जोडपेच दुरावले गेले. पक आपली चूक सुधारायचे आश्वासन देतो. ओबेरॉन व पक अदृश्य असतात त्यामुळे इतरांना त्यांच्या हालचाली दिसत नाहीत. हर्मिया-डिमेट्रियस पुढे जातात. थकलेला डिमेट्रियस थकून गवतावर झोपतो व हर्मिया लिसॅण्डरच्या शोधात निघून जाते. पक डिमेट्रियसच्या डोळ्यात फूल चुरगळून रसाचे २ थेंब टाकतो.

इकडे टिटानिया जागी होण्याच्या सुमारास बॉटम नावाच्या परीसेवकावर त्याचे इतर सहकारी गंमती गंमती मध्ये गाढवाचे डोके बसवतात व त्याच्या भोवती नाचतात व तोही गंमतीने गाढवासारखे खिंकाळू लागतो. त्याच्या त्या आवाजाने टिटानिया जागी होते. बाकीचे सेवक अपराधी भावनेने पळून जातात पण डोके अडकलेला बॉटम तेथेच थांबतो. जागी झालेली परी राणी टिटानिया त्याला पाहताच त्याच्या प्रेमात पडते व त्याच्याशी लाडीगोडी करू लागते. हा सर्व हास्यास्पद देखावा पाहून ओबेरॉनची खूप करमणूक होते व तो ’बरी जिरली’ असे म्हणत तिची मजा पहात बसतो. शेवटी त्याला तिची दया येते व थोड्या वेळाने ती कंटाळून झोपल्यावर तो तिच्या डोळ्यात दुसऱ्या एका फुलाचे थेंब टाकतो. त्यामुळे पहिल्या फुलाचा परिणाम निघून जातो. थोड्या वेळाने तो तिला उठवतो व ती आपले भांडण विसरून प्रेमात येते व त्यांचा मिलाफ होतो.

इकडे लिसॅण्डरच्या नको असलेल्या प्रेमाला कंटाळून हेलेना व तिच्या पाठोपाठ लिसॅण्डर डिमेट्रियस जेथे झोपलेला असतो तेथे येतात. त्यांच्या मोठमोठ्या बोलण्याने डिमेट्रियस जागा होतो व हेलेनाला पाहताच तिच्या प्रेमात पडतो. झाले, आता हेलेनाच्या प्रेमासाठी डिमेट्रियस व लिसॅण्डर यांची जुगलबंदी सुरू होते. तेथे आलेली हर्मिया या सर्व प्रकाराबद्दल हेलेनालाच दोषी धरते व त्या दोघीत वादावादी सुरू होते. सगळा गोंधळ माजतो. हेलेनाच्या प्रेमासाठी डिमेट्रियस व लिसॅण्डर मुद्द्यावरून गुद्द्यावर येऊ लागतात. त्याच वेळी ओबेरॉन तेथे येतो व पकला दोघांना एकमेकापासून खोटे आवाज काढत दूर घेऊन जायला सांगतो. पहाटेचा संधिप्रकाश येऊ लागल्यामुळे सर्व जंगल धुक्यात लपेटायला सांगतो व झोप लागल्यावर लिसॅण्डरच्या डोळ्यांत दुसरा रस घालायला सांगतो. पक हुशारीने सर्वांना तेथून दुर नेतो. रात्रभरची रपेट व जाग्रण यामुळे ते चौघेही जण एका खुल्या गवताळ जागेत पोचताच एकेक करत गाढ झोपी जातात. पक लिसॅण्डरच्या डोळ्यात दुसऱ्या औषधाचे थेंब टाकतो.

पहाट झाल्यामुळे ड्यूक, एग्यस, व ड्यूकची नियोजित पत्नी हिपोलिटा परीवनात येतात. त्यांच्या आगमनाच्या भोंग्याने चौघेही जण खडबडून जागे होतात. सूर्योदय होताच एग्यस ड्यूकला आपल्या तक्रारीची आठवण करून देतो. हर्मियाला दिलेली वेळ संपलेली असते. डिमेट्रियस व लिसॅण्डर रात्रीच्या घटनाचा आपला आपला अहवाल देतात. डिमेट्रियसचे हेलेनावरील पहिले प्रेम उफाळून आलेले असते, त्यामुळे तो हर्मियाशी लग्न करायला नकार देतो. त्यामुळे ड्यूक एग्यसची तक्रार निकालात काढतो, एग्यसचाही हट्ट संपतो. ड्यूक-हिपोलिटाच्या विवाहाबरोबरच डिमेट्रियस-हेलेना व

लिसॅण्डर-हर्मिया या दोन्ही जोडप्यांची लग्ने थाटामाटात साजरी होतात आणि उन्हाळ्यातील मध्यरात्रीच्या गोड स्वप्नाप्रमाणे वाटणारी ही सुखांतिका सर्वांना आनंद देऊन संपते.

गंमत अशी की यातील प्रत्येक प्रेमिकाला जे झाले ते स्वप्नच वाटते, म्हणून नाटकाचे नाव 'A Midsummer Night's  Dream' म्हणजेच ’ऐन उन्हाळ्यातील मध्यरात्री पडलेले स्वप्न’. अर्थात इंग्लंडमध्ये उन्हाळा सर्वांना हवाहवासा वाटतो.

०००००-----०००००

आपल्या प्रतिक्रिया/सूचना कळवाः
Phone: 020-25881194, 98811-49755
Email: joshi.bindumadhav@gmail.com